सकाळ posiview

पुणे, सोमवार, २ जानेवारी २०१२ : ८

आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी. एन.सी.डब्ल्यू./डी-१६६/२०१२-२०१४.

Active गुंतवणूक

# टॅक्स फ्री बाँड्स : गुंतवणुकीची चांगली संधी !



राहुल मंत्री

posiview.response@esakal.com

नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) आणि पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) या कंपन्यांतर्फे १० आणि १५ वर्षे मुदतीचे टॅक्स फ्री बाँड्स बाजारात विक्रीसाठी खुले झाले आहेत. यामध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना अनुक्रमे ८.२ टक्के व ८.३ टक्के करमुक्त परतावा मिळणार आहे. बँकांच्या मुदत ठेव व्याजदराच्या तुलनेत वरकरणी जरी हे दर कमी दिसत असले, तरी २० टक्के किंवा त्याहून अधिक करपात्रतेच्या पट्ट्यातील गुंतवणूकदारांना हे बाँड्स निश्चितपणे आकर्षित करणारे असून, उच्च उत्पन्न गटातील करदात्यांसाठी हे बाँड्स म्हणजे गुंतवणुकीची एक चांगली संधी आहे.

**एनएचएआय आणि पीएफसी बाँड्समधील परताव्याचा लेखाजोखा**

| | १० वर्षे | १५ वर्षे |
|---|---|---|
| कराचा दर | ८.२०% | ८.३०% |
| १०.३०% | ९.१४% | ९.२५% |
| २०.६०% | १०.३३% | १०.४५% |
| ३०.९०% | ११.८७% | १२.०१% |

जे करदाते २०.६ टक्के प्राप्तिकर भरतात, त्यांना किमान १०.३३ टक्के परतावा देऊ शकेल अशाच योजनेमध्ये गुंतवणूक करायला हवी. ज्यामुळे कर वजा झाल्यानंतर त्यांना प्रत्यक्षात ८.२ टक्के परतावा मिळेल. त्याचप्रमाणे ३०.९ प्राप्तिकर भरणाऱ्यांना, ज्या योजनेतून किमान ११.८७ टक्के परतावा मिळू शकेल, अशातच गुंतवणूक करणे भाग आहे. या टॅक्स फ्री बाँड्सना 'एएए' मानांकन असून, सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भारत सरकारने या योजनेला प्रोत्साहन दिले असल्याने, यामध्ये जोखीम जवळपास नाही, म्हटले तरी चालेल. त्यामुळे २०.६ टक्के किंवा ३०.९ टक्के प्राप्तिकराच्या पट्ट्यामध्ये जे गुंतवणूकदार येतात आणि ज्यांना दीर्घ मुदतीसाठी एक निश्चित उत्पन्नदेखील मिळविण्याची इच्छा आहे, अशांनी या बाँड्समध्ये अवश्य गुंतवणूक करावी. या बाँड्सना संपत्तिकराच्या जाळ्यातून (वेल्थ टॅक्स) देखील वगळण्यात आले असल्याने उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींसाठी हे बाँड्स अगदी आदर्श आहेत.

जे गुंतवणूकदार १०.३ टक्के किंवा कमी कराच्या पट्ट्यात येतात, त्यांनी या बाँड्सकडे दुर्लक्ष केले तरी चालेल, कारण त्यांच्यासाठी यापेक्षा जास्त प्रमाणात करमुक्त परतावा मिळवून देणाऱ्या अन्य योजना सध्या बाजारात आहेत. मात्र जे गुंतवणूकदार कमी कराच्या पट्ट्यात येतात; परंतु ज्यांना असे वाटते की पुढे जाऊन आपल्याला अधिक कर भरावा लागणार आहे, अशांनी आताच या बाँड्समधील गुंतवणुकीचा विचार करायला हरकत नाही. जरी या बाँड्सची मुदत १० वर्षे आणि १५ वर्षे असली, गुंतवणूकदारांना शेअर बाजारात विक्री करून यामधून बाहेर पडण्याचा पर्यायदेखील उपलब्ध आहे. परंतु शेअर बाजारात बाँड्स आणि डिबेंचर्स यांची अल्प प्रमाणात उलाढाल होत असल्याने, १० वर्षांपेक्षा कमी काळासाठी गुंतवणूक करण्याची इच्छा असणाऱ्यांनी या बाँड्सचा विचार करू नये. नजीकच्या काळात हुडको आणि इंडियन रेल्वे फायनान्स कॉर्पोरेशन हेदेखील टॅक्स फ्री बाँड्स घेऊन येणार आहेत. त्या इश्यूंसाठीचा कूपन रेट (व्याजदर) अद्याप निश्चित झालेला नसला, तरी सध्या उपलब्ध असणाऱ्या टॅक्स फ्री बाँड्सच्या तुलनेत त्यांच्या दरामध्ये फार मोठा फरक असेल, असे वाटत नाही.

**(लेखक सर्टिफाईड फायनान्शियल प्लॅनर - सीएफपी आहेत.)**